ISSN 2231-5063 Impact Factor : 4.6052(UIF) Volume - 6 | Issue - 5 | November - 2016

Golden Research Thoughts

# काश्मीर समस्या (Kashmir Problem)

प्रा. डॉ. संजय प्रभाकर ढाके.
विभागप्रमुख ,संरक्षण व सामरिकशास्त्र विभाग, कै.म.दि. सिसोदे ऊर्फ भाऊसाहेब कला व वाणिज्य महाविद्यालय, नरडाणा ता. शिंदखेडा जि. धुळे.

## प्रस्तावना (Introduction) :

भारताचे 'शीर' आणि 'नंदनवन' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या काश्मीरचा प्रदेश स्वातंत्र्य मिळाल्यापासून ते आजपर्यंत धगधगत आहे. निसर्गाने समृध्द असलेल्या काश्मीरची समस्या भारतासाठी अतिशय धोकादायक बनलेली आहे.

काश्मीर समस्या ही भारत व पाकिस्तानशी संबंधित समस्या आहे. इ.स. १९४७ पासून ही समस्या मुद्दाम पेटती ठेवण्याचे काम पाकीस्ताननने केले आहे. या समस्येवरुन दोन्ही देशात तणावाचे व संघर्षाचे वातावरण सतत निर्माण होत असते. निसर्गसौदर्याने युक्त असलेल्या या प्रदेशात हिंदु, मुस्लिम व इतर धर्मियांचे वास्तव्य या प्रदेशात आहे. १९४७ मध्ये अखंड हिंदुस्तानची धार्मिक तत्वावर फाळणी होऊन भारत व पाकिस्तान या दोन देशांची नर्मिती झाली. भारतात त्यावेळी जितकी संस्थाने होती त्यातील एक संस्थान काश्मिर होते. त्यावेळी या संस्थानांना भारत किंवा पाकिस्तानात विलीन होण्यासंबंधीची मुभा देण्यात आलीली होती. पण काश्मीरने भारत आणि पाकिस्तान यापैकी कोणत्याही देशात आपले संस्थान विलीन न करण्याचे ठरविले होते. त्यावेळी काश्मीरमध्ये जवळजवळ ७५% लोक मुस्लीम व २५%लोकसंख्या हिंदु व इतर होती. काश्मिरमधील बहुसंख्य लोकसंख्या मुस्लीम असल्याने काश्मीरने पाकीस्तानात सामिल व्हावे अशी पाकीस्तानच्या राजकारण्यांना वाटत होते. त्यामुळे त्यांनी काश्मिर पाकीस्तानमध्ये सामिल होण्याची वाट न पाहता काश्मिर वर १९४७ मध्ये घुसखोर पाठवून लष्करी बळाचा वापर करुन युध्द लादले. पाकीस्तानने बळाचा वापर केल्यामुळे त्यावेळी काश्मिरचे राजे हरिसिंग यांनी भारताकडे मदत मागितली. २६ ऑक्टोबर १९४७ रोजी जम्मु काश्मिरच्या महाराजांनी भारतातील काश्मिरच्या विलीनीकरणाला मान्यता दिली. राजे हरिसिंग यांनी काश्मिरच्या विलीनीकरणाला दिलेली मान्यता व मागितलेली लष्करी मदत या विनंतीला मान्यता देऊन भारताने भारतीय सैन्य काश्मिरमध्ये २७ ऑक्टोबर १९४७ ला पाठविले. भारतीय सैन्याने पाकीस्तानी हल्लेखोरांवर हल्ले करुन त्यांना नमविले परंतु कार्यवाही पुर्णत्वाची खात्री केली नाही त्या काश्मिरचा काही भाग पाकिस्तानने गिळकृंत केला. १ जानेवारी १९४८ रोजी काश्मिरवरील कारवाई थांबली. गिळंकृत केलेल्या काश्मिरच्या भागाचे क्षेत्रफळ ७४१४४ चौरस कि.मी. आहे. यामुळे पाकीस्तानला या भागात पाय रोखता आले. पाकीस्तानच्या बेकायदेशीर कारवायांमुळे जानेवारी १९४८ मध्ये भारताने काश्मिरचा प्रश्न संयुक्त राष्ट्रसंघापुढे उपस्थित केला असुनही हा प्रश्न मिटलेला नाही. काश्मीरचे विलीनीकरण मान्य करण्यात आले. परंतु काश्मिरमध्ये सार्वमत घेण्याचे भारताचे पंतप्रधान पंडित नेहरु यांनी आश्वासन दिले. अजूनही काश्मिर बाबत अनेक समस्या निर्माण झालेल्या आहेत. भारतीय कायदा कलम ३७० नुसार जम्मु-काश्मिरला विशेष दर्जा दिला गेला. काश्मिरमध्ये शांतता व सुव्यवस्था यावी म्हणुन परंतु या कलमाच्या स्वातंत्र्यांचा वेगळा अर्थ लावुन फुटीरवादीशक्ती काश्मिरमध्ये अस्थिरता निर्माण करण्याचा सतत प्रयत्न करीत आहे. दहशतवाद, फुटीरता यांचे काश्मिर हे केंद्र बनले. पाकीस्तानने चीनला काश्मिरचा काही प्रदेश देऊन ही समस्या आणखीनच चिघळून ठेवली आहे.



इ.स. १९७१ मध्ये भारत-पाकीस्तान युध्दात भारताने अभिमान वाटावा असा विजय मिळवीला. त्यानंतर १९७२ मध्ये सिमला करार करुन तत्कालीन पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधीनी काश्मीरमध्ये शांतता निर्माण करण्याचा प्रयत्न केला. पुढे काश्मीरमध्ये फुटीरवाद्यांच्या अनेक संघटना सक्रिय झाल्या. त्यांनी बॉम्बस्फोट, खुन, अपहरण, दंगे, दरोडे या माध्यमांतुन काश्मिर अशांत कसा राहिल याचाच प्रयत्न केला.

१९९९ च्या कारगिल संघर्षामध्ये भारतीय सैन्याला यश मिळुन कारगिल प्रदेश पाकीस्तान घुसखोरांकडून सोडविला. या मोहिमेला 'ऑपरेशन विजय' असे संबोधले गेले. या मोहिमेला पुरक कार्य करण्याची जबाबदारी हवाईदलाकडे सोपविण्यात आली. त्यांच्या या मोहिमेला, कार्यवाहीला 'ऑपरेशन सफेदसागर' असे म्हटले गेले.

भारतीय लष्कराने काश्मीरमध्ये फुटीरवाद्यांना पकडण्यासाठी त्यांचे तळ, नष्ट करण्यासाठी २००२ मध्ये 'ऑपरेशन सर्वविनाश' हि मोहिम राबविली गेली. एवढे असुनही काश्मिर अशांतच आहे. तेथे दहशतवादी कारवाया सुरुच आहेत.

## काश्मीरचे भुराजकीय व लष्करी महत्व (Geopolitical and Military importance of Kashmir):

काश्मीरचे भारतामध्ये विलीनीकरण झाल्यानंतर ते भारताचा अविभाज्य भाग बनले. त्यामुळे त्याची सुरक्षा व संरक्षण करणे हे भारताचे प्रमुख कर्तव्य ठरते. पाकिस्तानलाही काश्मीर हवे आहे. कारण काश्मीरचे भुराजकीय व लष्करी महत्व मोठ्या प्रमाणात आहे. काश्मीरच्या उत्तरेस काराकोरस पर्वत, मध्यभागी हिमालय तर दक्षिणेस परिपंजाल पर्वत असुन या पर्वतश्रेणी मध्ये सुपीक व सपाट काश्मीर खोरे आहे. काश्मीरच्या वायव्येस पाकिस्तान, अफगाणिस्तान, सोव्हिएत रशियातुन वेगळे झालेले कझाकिस्तान व चीन यांच्या सीमा एकत्र येतात. त्या काश्मीरचा भाग अत्यंत संवेदनशील असुन जोझिला, खुंजोव, गिलगीट या खिंडी आणि नंदादेवी, नंगा पर्वत हे लष्करीदृष्ट्या महत्वाचे आहेत. काराकोरम व गिलगीट क्षेत्रोचे महत्व भारताच्या दृष्टीने अधिक आहे. याच भागात १९४९ च्या जानेवारी मध्ये पाकव्याप्त काश्मीर व भारतीय काश्मीर यांच्या युध्दबंदी रेषा आखली नाही. काश्मीरचे भुराजकीय व लष्करी महत्व असल्याकारणाने शीतयुध्द काळात अमेरिका, सोव्हिएत रशिया, चीन यांनाही आंतरराष्ट्रीय राजकारणासाठी या परिसरात आपले अस्तित्व असावे असे वाटत होते. त्यामुळे भारताच्या सुरक्षेच्या दृष्टीने काश्मीर प्रश्न अधिक संवेदनशील झाला आहे.

## काश्मीर समस्येची कारणे (Causes of Kashmir Problem):

### भारताच्या बाजुने काश्मीर समस्येची कारणे :

१. काश्मीरमध्ये आपले राजकीय अस्तित्व कायम रहावे यासाठी १९४७ पासुन शेख अब्दुल्ला, गुलाम महंमद बक्षी, आणि जी.एस. सादिक यांनी प्रयत्न केले. मुस्लीम प्रभावक्षेत्र वाढविण्याचा व त्यांचेच वर्चस्व काश्मीरवर असावे असा विचार वळावु लागला आहे. त्यातुनच कट्टरवाद अस्तित्वात येण्यास मदत झाली.

२. काश्मीरचे भौगोलिक, राजकिय व युध्दनैतिक अस्तित्व वेगळे होते ते कायम ठेवण्यासाठी '३७० कलमाची' अंमलबजावणी काश्मीरी नेत्यांनी करुन घेतली. त्यावेळी ती गरजही होती. कारण काश्मीरची आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक स्तरावर जुळवणी करणे महत्वाचे होते.

३. काश्मीरच्या उंच पर्वतीय भुभागात क्षेपणास्त्रांचे तळ निर्माण केल्यास तेथुन ३००० कि.मी.च्या परिसरातील भुभाग क्षेपणास्त्राच्या टप्प्यात आणता येतो.

४. जगातील उंच ठिकाणी असलेला सियाचीन येथील लष्करी तळ हा युध्दनैतिक दृष्ट्या महत्वाचा ठरतो. पाकीस्तानला तो परिसर आपल्याकडे असावा असे वाटते.

५. पाकिस्तान काश्मीर मधील मुसलमानांवर होत असलेल्या अन्यायामुळे ते विकासापासुन वंचित आहे. अशी जाणीव सातत्याने करुन देत असतो. त्यामुळे काश्मीर मधील जनतेच्या भावना भडकावल्या जातात.

६. लष्करी बळावर काश्मीर हस्तगत करणे शक्य नाही याची जाणीव झाल्यामुळे पाकीस्तान काश्मीर मध्ये योजना बद्ध पध्दतीने फुटीरवादी वृत्ती जोपासण्याचे कार्य करीत आहे. पाकव्याप्त काश्मीरमध्ये व पाकिस्तान मध्ये फुटीरवाद्यांना व दहशतवाद्यांना प्रशिक्षण देणारी केंद्रे निर्माण करुन फुटीरवाद निर्माण करीत आहे.

### पाकिस्तानच्या बाजुने काश्मीर समस्येची कारणे :

१. काश्मीर समस्या ही पाकिस्तानने त्याच्या निर्मितीपासूनच प्रतिष्ठेची करुन घेतली आहे. लियाकत अली खान काश्मीरला 'पाकिस्तानची टोपी' समजत होते. त्यामुळे काश्मीर पाकिस्तानातच असावे असे वाटते.

२. भौगोलिक दृष्ट्या काश्मीरचा भूभाग व पाकिस्तानच उत्तर भाग संलग्न आहे. भारत आणि काश्मीर मध्ये पर्वतरांगा असल्याने भौगोलिक संलग्नता नाही.
३. हिमालयात उगम पावणाऱ्या सिंधु, चिनबा, रावी, सतलज आणि झेलम या नद्या भारतातून पाकिस्तानात वाहत येतात. परंतु काश्मीर भारतात असल्यामुळे त्या नद्यांच्या पाण्याचा हिस्सा भारताल देणे क्रमप्राप्त ठरते.
४. काश्मीरच्या डोंगराळ भागात विद्युत निर्मीती करता येऊ शकते. त्यामुळे पाकिस्तानच्या इंधन व पाण्याची समस्या सुटेल व विकासाला हातभार लागेल.
५. पाकिस्तान मध्ये असलेल्या खेळाच्या साहित्याच्या कारखाण्यांना लागणारा कच्चा माल (लाकुड) काश्मीरच्या जंगलात आहे त्यामुळे त्यासंबंधी पाकिस्ताला भारतावर अवलंबुन रहावे लागते.
६. काश्मीर हे पर्यटन केंद्र असल्याने तेथील पर्यटन व्यवसायातुन परकीय चलनाची प्राप्ती होऊ शकते.

### भारताच्या सुरक्षेला असलेली आव्हाने (Challenges to Indian Security) :

१. काश्मीरचा भूभाग १०,००० ते १८,००० मीटर उंचीचा असल्याकारणाने काश्मीरच्या संरक्षणासाठी भारतीय लष्करास एक मोठे आव्हान आहे.
२. काश्मीर मध्ये जाण्यासाठी जम्मु-श्रीनगर हा एकमेव महामार्ग असल्याकारणाने काश्मीर मध्ये जलद दळणवळण व संपर्क करणे अवघड असते.
३. पाकीस्तानी सैन्य व दहशतवाद्यांचे तळ काश्मीरच्या उंच व पर्वतीय भागात असल्याने ते उंचावर असतात. त्यांना तेथुन हुसकावुन लावणारे भारतीय सैनिक पर्वतीय भागाच्या पायथ्याशी असतात. त्यामुळे भारतीय लष्कराची वेळ, शक्तीची मोठी हानी होते.
४. सियाचीन सारख्या कायम बर्फाच्छादित असलेल्या भु-भागात भारतीय लष्कराचा कायम स्वरुपी तळ आहे. तेथील सैनिकांना पिण्याचे पाणी, राशन, इंधन, तेल, दारुगोळ पुरविणे त्याचा साठा करणे याची समस्या कायम उद्‌भवते.
५. काश्मीर मध्ये भरकटलेल्या व बेरोजगार तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देणे.
६. काश्मीर मधील जनतेची पाकिस्तानकडुन होणारी दिशाभुल थांबविण्यासाठी प्रसार माध्यमांचा प्रभावी पणे उपयोग करणे.
७. काश्मीर आणि उर्वरित भारत यांच्यातील जनतेच्या दैनंदिन व्यवहारातील शिक्षण, आरोग्य, सामाजिक व्यवहार यांच्यातील फरक दाखवला तर काश्मीर मधील जनतेच्या भारत विषयीच्या दृष्टीकोनातुन फरक पडु शकतो.
८. काश्मीरमधील दहशतवादी कारवाया नियंत्री करण्यासाठी युध्द सहाय्य, लष्करी मोहिमा कराव्या लागतात.

काश्मीरमध्ये फुटीरवादाची सुरुवात काश्मीरच्या विलीनीकरणापासुनच झाली. काश्मीरला स्वंतंत्र व वेगळे ठेवण्याचा प्रयत्न शेख अब्दुल्ला यांनी केला. पुढे '३७० च्या कलमा' ची तीव्रता कमी करुन हळुहळु शिथील करण्याचा प्रयत्न केंद्र सरकारकडुन सुरु झाला. त्याचबरोबर शेख अब्दुल्ला यांनी आपले राजकिय अस्तित्व कायम राखण्यासाठी १९५३ मध्ये काश्मीरच्या स्वतंत्र अस्तित्वाच्या नावाखाली कारवाया करण्यास सुरुवात केली. त्यासंदर्भात त्यांना अटकही करण्यात आली. तरी त्यांच्या भारत विरोधी कारवाया सुरु होत्या.

पाकिस्तानने वेळोवेळी संयुक्त राष्ट्र संघटना, अलिप्त राष्ट्रांची परिषद आणि दक्षिण आशियांची देशांच्या (सार्क) परिषदेत काश्मीर प्रश्न उपस्थित करुन आंतरराष्ट्रीय पातळीवर आणण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच काश्मीर मधील फुटीरवाद्यांना काश्मीर मधील मुसलमान धोक्यात आहेत. याची जाणीव देऊन फुटीरवादी कारवाया सतत चालु ठेवण्याचा प्रयत्न केला जातो.

काश्मीरमध्ये फुटीरवाद्यांच्या अनेक संघटना आहे. पाक पुरस्कृत दहशतवादी संघटना फुटीरवादी संघटनांना हाताशी धरुन अपहरण, हत्या, बॉम्बस्फोट, बँकावरील दरोडे, लोकांमध्ये भीती निर्माण करुन काश्मीर खोऱ्यातील हिंदुच्या कत्तली व त्यांना विस्थापीत केले आहे. काश्मीर मध्ये शरीयत कायदा लावण्यासाठी धमकी तंत्राचा उपयोग केला. धार्मिक शिक्षणावर भर दिला जात आहे.

सध्या परिस्थिती काश्मीरच्या सीमावर्ती भागात पाक लष्कर व अतिरेकी मोठ्या प्रमाणावर घुसघोरी करुन घातपाती कारवायांचे प्रमाण वाढले आहे. त्यात 'लष्कर-ए-तोयबा, जैश-ए-मोहम्मद, हिज्बुल मुजाहिद्दीन' तसेच अलिकडील जगाला धोकेदायक असणारी 'इसिस' ही जहाल अतिरेकी संघटना हिंसक कारवाया वाढविण्याच्या प्रयत्नात आहेत. अलिकडील पठाणकोडच्या भारतीय वायुसेनाच्या हवाई तळावर अतिरेक्यांनी केलेला हल्ला जैश-ए-मोहम्मद या दहतशवादी संघटनेने केला आहे. याचे पुरावे मिळाले आहेत.

### काश्मीर समस्येचे परिणाम (Effects of Kashmir Problem):

फुटीरवाद्यांच्या अतिरेकी व दहशतवादी कारवायांमुळे काश्मिरमध्ये राजकीय, सामाजिक व आर्थिक परिणाम झाले. ते पुढीलप्रमाणे :

१. काश्मिरचा आर्थिक विकास खुंटला.

२. बेरोजगारी वाढली.
३. पाकीस्तानी दहतशवाद्यांच्या चिथावणीमुळे धार्मिक तेढ निर्माण झाली. तेथील हिंदु असुरक्षित झाले.
४. लष्करांवर खुप खर्च झाला. दहशतवाद्यांच्या कारवाया रोखतांना भारतीय सैनिकांनी जीवाची बाजी लावली त्यात अनेक सैनिक शहीद झाले. त्यांनी देशासाठी बलिदान केले.
५. धार्मिक शिक्षण यामुळे काश्मिर युवकांना वेगळे वळण मिळाले. कट्टरवाद जोपासला गेला. धर्मांध कृत्यांमध्ये वाढ झाली.
६. काश्मिरमध्ये कायदा व सुव्यवस्था बिघडली. काश्मीर खोऱ्यातून इतरस्त्र स्थलांतराचा ओघ वाढला.
७. काही मुस्लिम युवकांची दिशाभुल करुन त्यांना फुटीरवादी कारवायांसाठी प्रोत्साहीत केले गेले.
८. अनेक स्त्रिया फुटीरवाद्यांच्या हल्ल्यांमुळे विधवा झाल्या. त्यांच्या रोजीरोटीचा प्रश्न निर्माण झाले.बालके निराधार झाली.
९. अनेक व्यक्ती संपत्तीहीन झाल्या, बेघर झाल्या.
१०. शैक्षणिक व्यवस्था कोलमडली.
११. सामाजिक शांतता धोक्यात आली.
१२. काश्मिरमधील सैनिकांनी गोळीबार केला तर त्यास प्रत्युतर म्हणुन दहशतवादी मोठे हत्याकांड घडवुन आणतात. बऱ्याचदा दहशतवादी पोलिसांवर हल्ले करुन त्यांना ठार करतात.
१३. सततची निर्माण होणारी संचारबंदी यामुळे जनजीवन विस्कळीत बनले. अनेक समस्या निर्माण होउन काश्मीरी लोकांची मन:स्थिती बिघडली. त्यातुन फुटीरवादी भावना वाढीस लागली.
१४. पर्यटनातुन काश्मीरला फार मोठे चलन प्राप्त होत होते पण दहशतवादी कारवायामुळे पर्यटकांनी काश्मीरकडे पाठ फिरवली परिणाम काश्मिरला पर्यटनचा माध्यमातुन प्राप्त होणारे चलन कमी झाले. आर्थिक परिस्थितीवर विपरीत परिणाम झाला.
१५. सफरचंदाच्या व शेतीतील इतर उत्पादनांवर परिणाम झाला.
१६. स्थानिक व्यवसायांवर विपरित परिणाम झाले.

## उपाययोजना (Remedies) :

काश्मिर खोऱ्यात शांतात नांदावी, विस्कळीत जनजीवन योग्य मार्गावर यावे यासाठी खालील उपाय योजण्याची गरज आहे.

१. काश्मिरमध्ये आर्थिक विकास घडवुन आणण्याच्या दृष्टीकोनातुन भारत सरकारने विशेष योजना राबविण्याची गरज आहे. त्यादृष्टीकोनातुन सरकारी पातळीवर त्या योजना आखुन त्या राबविण्यास सुरुवात झालेली आहे. यामुळे काश्मिर खोऱ्यातील आर्थिक विकासास चालना मिळून बेरोजगारीचे प्रमाण कमी होईल.
२. काश्मिरी व्यक्तींना राष्ट्रीय प्रवाहामध्ये आणण्याचे प्रयत्न सुरु असुन त्या दृष्टीकोनातुन सामाजिक व राजकीय प्रयत्न सुरु आहेत व त्यांना यशही मिळत आहे.
३. फुटीरवादी शक्तींना नियंत्रणात आणण्यासाठी, दहतशवादी कारवायांना प्रतिबंध घालण्यासाठी विविध लष्करी मोहिमा आयोजित केल्या जात असुन त्या मोहिमांना अपेक्षित यश मिळत आहे.
४. वाहतुक व दळणवळणाचा विकास करण्याची गरज काश्मिरमध्ये आहे. त्या दृष्टीकोनातुन प्रयत्न सुरु आहेत.
५. स्थानिक जनतेच्या गरजा लक्षात घेवुन त्यांची पुर्तता करण्याच्या दृष्टीकोनातुन प्रयत्न सुरु आहेत.
६. समाजसेवी संघटनासुध्दा काश्मीरमध्ये विधायक कार्य करीत असुन देशप्रेम जागृत करण्याचे काम करीत आहेत.
७. भारत सरकार राष्ट्रीय एकात्मता टिकविण्यासाठी काश्मिरमध्ये विविध कार्यक्रम आयोजित करीत असते.
८. काश्मिरमध्ये कायदा व सुव्यवस्था ठेवण्यासाठी लष्करी दलाकडुन विविध ऑपरेशन्स राबविली जातात. त्यात दहतशवाद्यांचा बिमोड करण्यात येतो. उदा. ऑपरेशन सर्व विनाशमध्ये अनेक अतिरेकी मारले गेलेत.
९. फुटीरवाद्यांच्या विरोधात कार्यवाही करण्यासाठी सन २०१२ मध्ये काश्मिरमध्ये असलेल्या लष्कराला विशेष अधिकार प्रदान केले गेले.
१०. पाकिस्तान आंतरराष्ट्रीय दबाव वाढण्याचे भारत सरकारचे प्रयत्न सुरुच आहे. त्या माध्यमातुन पाकीस्तानमध्ये लपुन बसलेल्या दहशतवाद्यांना भारताच्या हवाली करण्यासाठी भारत सरकारने पाकीस्तानावर आंतरराष्ट्रीय दबाव वाढवला आहे.

स्वातंत्र्यानंतर ऑक्टोबर १९४७ मध्ये पाकिस्तान ने केलेल्या आक्रमणात काश्मीरचा काही भाग हिसकावून तो 'आझाद काश्मीर' या नावाने आपल्या ताब्यात ठेवलेला आहे.

काश्मीर विरळ लोकवस्तीचा आणि हिमालयीन पर्वत रांगांचा भुभाग आहे. काश्मीरचे जम्मु विभागात बहुसंख्य हिंदुधर्मीय आहेत. त्यांची संख्या १,९३,४४८ आहे. काश्मीर खोऱ्यात मुस्लीम धर्मीयांची संख्या मोठी असुन ती ३८,४३,४५१ आहे आणि लडाक भागात बौध्दधर्मीयांची संख्या ६९,७०६ आहे. याशिवाय ख्रिश्चन ८४८१, शीख १,३३१६७६ आहेत. त्यांच्यातील हिंदु-मुसलमानांमध्ये सुरुवातील

वेगळपणाची भावना नव्हती. परंतु आर्थिक असमतोल, जातीयता आणि राजकीय स्वार्थ यांच्यातून त्या भावना पेठविण्यात आल्या. पुनरुत्थानवादी संघटना कार्यरत होऊन प्रादेशिक फुटीरतेची भावना उफाळून आली. हिंदुवर अत्याचार करण्यात आले. सामूहिक हत्या सुरु झाल्या. हिंदुचे अस्तित्व धोक्यात आले. पाकिस्तान प्रणीत दहशतवादी कारवाया सुरु झाल्या. पाकिस्तानने त्यांना आर्थिक मदत दिली. शस्त्रासत्रे व प्रशिक्षण देऊन सक्रिया पाठिंबा देणे सुरु केले तेव्हा पासुन काश्मीर मधील अतिरेक्यांचा व सीमापार पाकिस्तानकडुन त्यांना मिळणारे पाठबळ असा दुहेरी धोका भारतीय सुरक्षेला निर्माण झाला.

## निष्कर्ष (Conclusion)-

भारताने सध्या स्थितीत काश्मीर समस्या कायमची सोडविण्यासाठी पाकव्याप्त काश्मीर व पाकिस्तानच्या लष्करी तळांवर हल्ला करुन पाकिस्तानला कायमचा धडा शिकविला पिाहजे. तसा प्रयत्न भारताने पाकिस्तानमध्ये सर्जीकल स्ट्राईक सारखा हल्ला करुन सप्टेंबर २०१६ मध्ये प्रयत्न केला तसे सर्जिकल स्ट्राईक पुन्हा-पुन्हा करण्याची गरज आहे व पाकिस्तानचे लष्करी तळे उध्वस्त केली पाहिजेत. त्याशिवाय भारताकडे चीनसारख्या देश कुरापती काढणार नाही. म्हणून भारताने एक धाडसी निर्णय घेवुन १९७१ च्या युध्दासारखे पाऊल उचचले पाहिजे तरच काश्मीर समस्या निकालात निघेल.

## संदर्भ (References):


१. प्रा. चौधरी अे.पी. चौधरी अर्चना, "भारताची अंतर्गत सुरक्षा", प्रशांत पब्लिकेशन्स, जळगांव- २००८.
२. परांजपे श्रीकांत भालचंद्र, "सामरिक शास्त्र", कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे- १९९४.
३. प्रा. चौधरी अे.पी., "युध्दविज्ञान (संरक्षण व सामरिकशास्त्र)" डायमंड पब्लिकेशन्स, पुणे- २००८.
४. गोखले शरदच्चंद्र,"झुंज दहशतवादाशी : काश्मीर एक अभ्यास", चिनार पब्लिकेशन्स, पुणे- २००५.
५. ढाके एस्.पी., पाटील व्ही.जे., "राजकिय भूगोल", प्रशांत पब्लिकेशन्स, जळगांव- २०१५.
६. डॉ.व्ही.वाय. जाधव, "भारताची राष्ट्रीय सुरक्षा", स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे- २०११.
७. ढाके एस्.व्ही., चौधरी अे.पी.,चौधरी अर्चना "भारताची अंतर्गत सुरक्षा", निराली प्रकाशन, २०१४.
८. धर्माधिकारी अ.भ., "चाणाक्य मंडळ- दिपावली विशेषांक", पुणे -२००४.
९. भागवत अ.वि., "राजकिय भूगोल", नरेंद्र प्रकाशन, पुणे- १९९३.
१०. दैनिक सकाळ, "काश्मीरच्या विलीनीकरणाची कथा", २६ ऑक्टोबर २००७.
११. दैनिक सकाळ, व्ही.के.मधोक, "काश्मीर प्रश्नात आता आक्रमक धोरण हाच पर्याय", १३ मार्च २००१.
१२. दैनिक लोकसत्ता.





**प्रा. डॉ. संजय प्रभाकर ढाके.**
**विभागप्रमुख ,संरक्षण व सामरिकशास्त्र विभाग, कै.म.दि. सिसोदे ऊर्फ भाऊसाहेब कला व वाणिज्य महाविद्यालय, नरडाणा ता. शिंदखेडा जि. धुळे.**